# भायखळा पोलीस ठाणे, मुंबई

**वार्तापत्र** **दिनांक ११/११/२०२४**

## बिहार येथे अपहरण करुन त्यानंतर तेथे खून करुन मुंबईत पळून आलेल्या आरोपीतास माहिती मिळाल्याच १२ तासाच्या आतमध्ये अटक केलेबाबत....

फिर्यादी नामे मुस्तकीम रहुफ खान वय ३३ वर्षे, रा.ठि. गांव - इंग्लिश चिचरोन, तहसिल / जिल्हा - भागलपुर, राज्य - बिहार. यांचा छोटा भाउ नामे मयत इसम मो. आलम रहुफ खान, वय - १६ वर्षे यांचे दिनांक ०५/११/२०२४ रोजी अज्ञात इसमांनी अपहरण केले होते. दिनांक ०८/११/२४ रोजी नमूद अपहरण झालेल्या इसमाचा मृतदेह मिळाल्याने अकबर नगर पोलीस ठाणे, भागलपुर, बिहार येथे गु.रजि.क्र. १२८/२४, कलम १४०(२),१०३,२३८,६१(२), बी.एन.एस अन्वये अपहरण आणि खूनाचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गंभीर गुन्हयाचे गांभिर्य ओळखून नमूद गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे शाहीद राजा उर्फ राजू नसिम खान, वय - २२ वर्षे, रा.ठि. इंग्लिश चिचरोन, तहसिल / जिल्हा - भागलपुर, राज्य - बिहार हा मुंबई येथे पळून आल्याची माहिती बिहार पोलीसांकडून मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -३ मुंबई यांना प्राप्त झाली. सदरची माहिती प्राप्त होताच त्यांनी भायखळा पोलीस ठाण्याचे सपोनि सुहास माने यांना सर्व हकीकत सांगून तपास करण्याचे आदेश दिले. त्यांनर सपोनि सुहास माने, भायखळा पोलीस ठाणे, मुंबई यांनी पाहिजे आरोपीताचा मोबाईल क्रमांक तसेच त्याचे भाउ यांचे मोबाईल क्रमांक प्राप्त करुन त्याचे तांत्रिक विश्लेषण करुन आरोपीची माहिती काढली असता, नमूद आरोपी हा **'सिटी मून'** हॉटेल, शॉप नं. ०१, ७६, तांडेल स्टीट, सरदार वल्लभभाई पटेल रोड, डोंगरी, मुंबई या हॉटेलमध्ये रहावयास असल्याची माहिती प्राप्त झाली. सदरची माहिती प्राप्त होताच तात्काळ सर जे.जे.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथील एटीसी अधिकारी सपोनि काळे व पथक तसेच भायखळा पोलीस ठाण्याचे सपोनि सुहास माने व पथक यांनी नमूद आरोपीताचा हॉटेलमध्ये जावून शोध घेतला असता तो तेथे मिळून आला. सदरचा पाहिजे आरोपी मिळून आल्यानंतर बिहार पोलीसांकडून पडताळणी केली असता त्यांनी नमूद इसम हाच वर नमूद गुन्हयातील पाहिजे आरोपी असल्याची माहिती सांगीतली.

नमूद आरोपीकडे केलेल्या तपासात त्याने वर नमूद गुन्हया केले असल्याचे निष्पन्न झाले. तसेच त्याचेकडे केलेल्या तपासामध्ये त्याने सन २०२२ मध्ये अकबर नगर पोलीस ठाणे, भागलपुर, बिहार येथे गु.रजि.क्र. ३१/२२, कलम ३६३, ३६५, ३०२,२०१, १२० (ब) भा.द.सं अन्वये अपहरण, खून, खूनाचा कट व खूनाचा पुरावा नष्ट करणे या गुन्हयामध्ये अटक केले असल्याचे सांगीतले. तसेच तपासामध्ये त्याने सध्या जामिनावर मुक्त झाल्याचे सांगीतले.

**अटक आरोपीताचा तपशील.**
**१) शाहीद राजा उर्फ राजू नसिम खान, वय - २२ वर्षे, रा.ठि. इंग्लिश चिचरोन, तहसिल / जिल्हा - भागलपुर, राज्य - बिहार**

दिनांक १०/११/२४ रोजी अकबर नगर पोलीस ठाणे, भागलपुर, बिहार येथील पोउनि रोहीत व पथक हे भायखळा पोलीस ठाणे येथे आले. बिहार पोलीसांनी नमूद आरोपीतास अटक करुन मा. न्यायालयात हजर केले असता दिनांक १४/११/२४ रोजी पर्यंत ट्रान्सीट रिमांड देण्यात आले आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी श्री. सत्यनाराण चौधरी, पोलीस सह आयुक्त (का व सु), श्री. अनिल पारसकर, अपर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, मुंबई, श्री. दत्तात्रय कांबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -३, श्री. शंकर चिंदरकर, सहायक पोलीस आयुक्त, आग्रीपाडा विभाग, श्री. विलास सुपे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक भायखळा पोलीस ठाणे, श्री. जितेश शिंगोटे, पोलीस निरीक्षक गुन्हे, यांच्या मार्गदर्शनाखाली भायखळा पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील सपोनि सुहास माने, पोह पठारे, पोह संजय जाधव, पोह देशमुख, पोह राकेश कदम, पोशि दिगंबर साताळकर, पोशि राजेश राठोड, पो.शि राकेश जाधव, पोशि सोमनाथ जगताप, पोशि जालींदर पिचड, पोशि सोनावणे, पोशि देसाई व पोशि राजेश पाटील यांनी केली आहे.

..................